# भारतीय जनता पक्ष

## (केंद्रिय कार्यालय)

## 11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

## फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

नवी दिल्ली 14 मार्च 2013 भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी सांगितले की आता वेळ आली आहे की देशाच्या सुरक्षेसाठी पाकिस्तानात सुरु असलेल्या दहशतवादाच्या फॅक्टरीला उद्ध्वस्त करण्याची कारवाई केली पाहिजे.

श्री नक्वी यांनी सांगितले की शांती आणि मैत्री चे ढोंग आता खुप झाले. आता पाकिस्तान आणि त्याच्या प्रायोजित दहशतवादाला त्यांच्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याची गरज आहे. शांतीची गोष्ट संयमाच्या मानसिकतेने नाही होऊ शकत.पाकिस्तान शांतीची भाषा बोलत आहे तर काम दहशतवादाचे करत आहे.

श्री नक्वी यांनी सांगितले की हे आम्ही कसे सहन करु की आमच्या जवानाची चिता थंड पण झाली नाही तर दुस-या जवान शहीद होत आहे. दुःख दायक गोष्ट आहे की सरकार ने केंद्रिय सुरक्षा दलाच्या हातून बंदुक हिसकावून घेऊन त्यांच्या हातात काठी दिली आहे आणि अशा बिनाशस्त्रधारी जवानांना दहशतवाद्यांशी मुकाबला करण्यासाठी सांगितले जात आहे.

श्री नक्वी यांनी आज राज्यसभेत काश्मीर मध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्याबाबत बोलताना सांगितले की प्रत्येक दहशतवादी घटना आणि सुरक्षा दलाचे जवान तसेच सामान्य लोक शहीद झाले की सरकार नेहमीप्रमाणे एकच रटलेले वक्तव्य करते

आणि आपली जबाबदारी पूर्ण करते आणि वाट पाहते की पुन्हा अशी कोणती दहशतवादी घटना होत आहे का.

श्री नक्वी यांनी सांगितले की सतत वाढत असलेल्या दहशतवादी घटनांमुळे देशात आक्रोश वाढत चालला आहे कि सरकार नरम आणि कमजोर पवित्रा सोडून देशाच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर मजबूत आणि आक्रमक पवित्रा घेतला पाहिजे आणि पाकिस्तान जी भाषा समजतो त्या भाषेतच उत्तर दिले पाहिजे.

श्री नक्वी यांनी सांगितले की काही दिवसांपूर्वी अफगाणिस्तानातील एका टी.वी.चॅनेल वर पाकिस्तान सरकारच्या एका संविधानिक संस्थेच्या सदस्याने भारताच्या विरोधात हल्ला-जिहाद करण्याचे ऐलान केले. यानंतरही सरकारने भारताविरुद्धच्या या ऐलानानंतर पाकिस्तान सरकारला काहीच विचारले नाही.

(ओ0 पी0 कोहली)
कार्यालय प्रभारी